

# ८ मार्च झिंदाबाद

## आंतरराष्ट्रीय कामगार महिला दिन एकजूटीने कार्यक्रम संघटित करा

**" स्त्रिया स्वतः झगडूनच स्वतःला मुक्त करून घेतील. "**

मार्च १९०८ या दिवशी अमेरिकेतील कष्टकरी, कामगार स्त्रियांनी प्रचंड निदर्शने केली. १२ ते १४ तास कारखान्यात राबणूक, अपुरे वेतन, कोंदट व गलिच्छ जागेत काम, यंत्रचा धोका अशा परिस्थिती-विरुद्ध झगडण्यासाठी हजारोंच्या संख्येने स्त्रिया रस्त्या-वर आल्या व त्यांनी न्यूयॉर्क शहराला हादरा दिला. मतदानाचा अधिकार मागून राजकारणातील भागी-दारीचा हक्क दजावण्याचा निर्धार केला.

जर्मन कामगार चळवळीच्या प्रमुख कार्यकर्त्या आणि आंतरराष्ट्रीय स्त्री–मुक्ती चळवळीच्या नेत्या क्लारा झेटकिन यांच्या पुरस्काराने १९१० मध्ये कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या **आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेमध्ये ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिवस** म्हणून पाळण्याचे ठरविण्यात आले. देशोदेशीच्या कष्टकरी स्त्रियांनी भांडवलशाही व साम्राज्यशाही वर्चस्वाविरुद्ध एकजूट बांधावी ह्या हेतूने हा दिवस निश्चित करण्यात आला आहे.

आज निरनिराळ्या ठिकाणी–कारखान्यात, ऑफि-सात, शेतात, खाणीत काम करणाऱ्या कष्टकऱ्यांच्या पुढे अनेक प्रश्न आहेत. कमी पगार, कामाचे जास्त तास, नोकरीची अशाश्वती, इत्यादी. बेकारी, दारिद्र्य याची झळ अनेक कुटुंबांना लागत आहे. भाववाढीमुळे ग्रामीण व शहरी कष्टकरी जनतेचे जीवन अतिशय हलाखीचे झाले आहे. ग्रामीण भागात तर भूमिहीनांच्या व बेकारांच्या संख्येत झपाट्याने भर पडत स्त्रियांच्या बेकारीची तर मोजदाद सुद्धा होत या सर्व अन्यायाविरुद्ध वेगवेगळ्या पातळीवर वेगळ्या ठिकाणी चाललेल्या झगड्यात स्त्रि भागीदारी आहेच. पण स्त्री म्हणून तिला आज काही समस्यांना तोंड द्यावे लागते. उदाहरणार्थ–

१) अनेक ठिकाणी स्त्रियांना कामावरच नाहीत. काही ठिकाणी फक्त लग्न होईपर्यंतच का घेतात. कारण स्पष्ट आहे. स्त्रियांना बाळंतप रजा द्यावी लागल्यामुळे त्यांच्या नफ्याला किंचित लागते. मुलांना जन्म देणे ही सामाजिक दृष्ट्या श्यक गोष्ट असली तरी कारखानदारांच्या वैय हिताच्या – नफ्याच्या ती आड येत असल्याने स्त्रियांना कामावर घेण्यासच नकार देतो.

२) पुरुषाइतके काम करूनही तिला केवळ म्हणून त्या कामाचा कमी मोबदला मिळतो.

३) जाहिराती व सिनेमा यामध्ये तिचा भोग म्हणून वापर केला जातो.

४) पोट भरण्यासाठी काही स्त्रियांना वेश्याव्य करावा लागतो.

५) अजूनही ८२% स्त्रिया निरक्षर आणि स्त्रिया आर्थिक दृष्ट्या परावलंबी आहेत.

६) पुरुष प्रधान कुटुंबपद्धतीमुळे घरातही स्थान कनिष्ठ, दुय्यम आहे. घरकाम, मुलांचे सं

या कामाच्या रगाड्यात तिला स्वतःची प्रगती करायला वेळ मिळत नाही.

७) ग्रामीण भागात पुरेसे व सतत काम मिळत नाही. त्यामुळे कायमच दारिद्र्य अवस्थेत जीवन जगावे लागते. रोजगारासाठी घर सोडून जाता येत नाही आणि रोजगारास आवश्यक असे शिक्षण व कसबही मिळत नाही.

८) हुंडा द्यायची ऐपत नाही म्हणून कित्येक मुलींची कुचंबणा होते.

हे आणि यांसारखे अनेक प्रश्न प्रत्येक स्त्रीला आपल्या रोजच्या जीवनात कोठेना कोठे खटकत असतात, सतवीत असतात. वेगवेगळ्या स्वरूपात तिला त्याची जाणीव होत असते. पण ही दुःखं वैयक्तिक पातळीवरच धुमसत राहतात. त्यातून बाहेर पडण्यास मार्ग दिसत नाही, आणि जी ती आपापल्या नशिबाला बोल लावत कुढत बसते. याबद्दल विचार करून काही करण्याइतका वेळ आणि शक्तीही तिच्याजवळ नसते.

पण आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करायचे ठरविले तर नक्कीच मार्ग सापडेल. आपले प्रश्न सोडविण्यासाठी आपण स्वतःच एकत्र येऊन संघटित होऊन मार्ग शोधल्या शिवाय आपले प्रश्न सुटणार नाहीत हे लक्षात घेऊन त्यादृष्टीचे काही उपक्रम हाती घेतले तरच खऱ्या अर्थाने आपल्याला ८ मार्चच्या दिवसाचे महत्त्व समजले असा होईल.

## महाराष्ट्रातील भगिनींना विनंती

८ मार्च १९७८ या आंतरराष्ट्रीय महिला दिनासंबंधीचे वरील पत्रक आपण सर्वांनी वाचावे, त्यावर चर्चा करावी. आपआपल्या गावात, खेड्यात आपण या दिवशी काय कार्यक्रम घेऊ शकता याचा विचार करावा व त्यासाठी प्रयत्न करावा अशी आपल्याला नम्र विनंती आहे. आमच्याकडून काही सहकार्य हवे असल्यास जरूर कळवावे. ८ मार्चचा कार्यक्रम पार पडल्यानंतर त्याचा अहवाल पाठवावा. हे अहवाल " बायजा मध्ये छापून आपल्या एकजुटीचा पाया घालू या.

## स्नेहलता रेड्डी

स्नेहलता रेड्डी. 'संस्कार' ह्या कानडी बोलपटाची अष्टपैलू नायिका. अन्यायाविरुद्ध सतत झगडणारी, लोकांच्या प्रश्नांसाठी झटणारी, साऱ्यांना हवीहवीशी वाटणारी.

१ मे १९७६ रोजी स्नेहलता रेड्डीला अटक करुन बंगलोर मध्यवर्ती तुरुंगात बंदी करण्यात आलं. आरोप कोणतेच ठेवलेले नव्हते आणि त्यासंबंधी काही विचारणेही शक्य नव्हते. दम्याचा विकार बळावला होता. पण राजबंदी असूनही धड वैद्यकीय मदत न मिळाल्याने स्नेहलताला प्राणांतिक वेदना भोगाव्या लागल्या.

आपली दोन मुलं, कुटुंबीय साऱ्यांपासून ओढून तुरुंगातल्या कोपऱ्यात स्नेहलताला डांबून टाकलं होतं. आणि का? स्नेहलता लिहिते, "काहीच कारण नसताना, मला तुरुंगात कोंडलं आहे. माझ्याजवळ लपवण्यासारखं कधीच काही नव्हतं. माझं सारं जीवन नितळ होतं आणि तरीही...कधीतरी वाटतं तुरुंगवास घडण्यासारखं काही केलं असतं तरी बरं झालं असतं!'

तुरुंगामधील स्त्री कैद्यांची स्थिती पाहून स्नेहलता रेड्डी विलक्षण अस्वस्थ होई. तुरुंगातही पुरुष-स्त्री भेदभाव केला जाई आणि स्त्रियांना कस्पटाप्रमाणे वागणूक मिळे. स्त्रियांनी धुणी भांडी करावी. केरवारे करावे. जेवण म्हणजे जणू सतरा रोगांना आमंत्रण!

स्नेहलताने सतत प्रयत्न करुन इतर स्त्री कैद्यांना लिहायला, वाचायला, करमणुकीसाठी खेळ खेळायला शिकवले. मेट्रनकडून स्त्री कैद्यांची होणारी अमानुष मारपीट तिने मध्ये पडून थांबवली. तुरुंगातील जेवणात काहीतरी सुधारणा व्हावी म्हणून तिने नऊ दिवस उपास करून सत्याग्रह केला. तुरुंगातही आपल्या सहकैद्यांची हलाखी कमी करण्यासाठी ती झटली. त्यांच्यावरील अन्याय आणि अत्याचार याविरुद्ध उभी राहिली. परंतु तुरुंगातील हेळसांड आणि हाल, अत्यंत अन्याय्य असा कारागृहवास यानी वेढलेली स्नेहलता झगडत, झिजत वयाच्या ४४ व्या वर्षीच मृत्यूमुखी पडली.

स्नेहलताच्या वर्षदिनी तिच्या स्मृतीला तिचे असंख्य स्नेही अभिवादन करीत आहेत. त्यामध्ये जाच सहन करणाऱ्या, नाडलेल्या अशा तिच्या असंख्य भगिनी आहेत. आणि तिचे झुंजार व्यक्तिमत्त्व, झगडणाऱ्या, धडपडणाऱ्या, अत्याचाराला सामोरे जाणाऱ्या अनेक भगिनींना स्फूर्तीस्थान ठरत आहे.

(स्नेहलता रेड्डीच्या 'डायरी' वरून)